# PANCHAVATI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD.

Reg. No.: NBOM / CIDCO / HSG (TC) / 9341 / JTR / 2022-23

KL- 6 (A), Condominium No. 26, Sector -1, Kalamboli, Navi Mumbai - 410 218.

*Ref.No.*............................ *Date :* 29/12/2025

प्रति,
मा. उप-निबंधक,
सहकारी संस्था, CIDCO,
सीबीडी बेलापूर,
नवी मुंबई.

**विषय :** पंचवटी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांच्या पुनर्विकास प्रकल्पाकरिता विकासकाची निवड करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेस कलम ७९-अ अन्वये **अधिकृत अधिकारी नियुक्त करण्याबाबत.**

महोदय / महोदया,

वरील विषयास अनुसरून आपणास नम्रपणे कळविण्यात येते की, **पंचवटी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**, कंडोमिनियम क्र. २६, सेक्टर १, कळंबोली , पनवेल, नवी मुंबई येथील इमारती ३० वर्ष पेक्षा जास्ती जुन्या व जीर्ण झालेल्या असून सद्यस्थितीत त्यांची संरचनात्मक अवस्था अतिशय खराब झाली आहे. त्यानुसार, संस्थेच्या सर्वसाधारण सभेत घेतलेल्या ठरावानुसार संस्थेच्या पुनर्विकासाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील **कलम ७९-अ** अन्वये आवश्यक त्या सर्व पूर्वतयारी व कायदेशीर बाबींची पूर्तता करून, पुनर्विकासासाठी **विकासकाची निवड करण्याकरिता निविदा प्रक्रिया** राबविण्यात आली आहे.

संस्थेस प्राप्त झालेल्या निविदा उघडल्यानंतर त्यांचे तांत्रिक व आर्थिक मूल्यांकन करण्यात आले असून, त्याबाबतचा **तुलनात्मक अहवाल** तयार करण्यात आला आहे. सदर अहवालावर सभासदांशी प्राथमिक चर्चा देखील करण्यात आलेली आहे. तरी, विकासकाची अंतिम निवड करण्यासाठी **कलम ७९-अ अंतर्गत विशेष सर्वसाधारण सभा (Special General Body Meeting)** घेणे आवश्यक असून, त्या सभेस आपल्या कार्यालयामार्फत **अधिकृत अधिकारी** नियुक्त करण्यात यावा, अशी विनंती करण्यात येत आहे.

या अर्जासोबत, कलम ७९-अ अंतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या सर्व आवश्यक कार्यवाहीची कागदपत्रे, ठरावांच्या प्रती व संबंधित अहवालांच्या प्रती संलग्न करण्यात आलेल्या आहेत.

आपले विश्वासू,

**पंचवटी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.,**

For Panchavati Co - operative Housing Society Ltd

Shobha

President | Secretary | Treasurer